International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# भारतीय प्रशासनासमोरील आव्हाने व सुधारणा : चिकित्सक अध्ययन

**डॉ. आकाश शेषराव बांगर**
*संशोधक विद्यार्थी, आदर्श महाविद्यालय, हिंगोली*
*Corresponding Author - डॉ. आकाश शेषराव बांगर*
**DOI - 10.5281/zenodo.7751303**

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात जगातील सर्वच राष्ट्र कल्याणकारी राज्य होऊ पाहत आहे. कल्याणकारी राज्य म्हणजे जनतेचे राज्य होय. महात्मा गांधी यांच्या मध्ये, 'जनतेचे हित जोपासणारे राज्य म्हणजे कल्याणकारी राज्य होय.' भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारली. कल्याणकारी राज्यात शासनाला अनेक महत्वपूर्ण कार्य पार पाडावे लागतात. त्यामुळे राज्याच्या कार्यात प्रचंड वाढ झालेली आहे. कल्याणकारी राज्य ही सर्व कार्य प्रशासनाच्या मदतीने पार पाडत असतो. पर्यायाने प्रशासनाच्या कामात प्रचंड वाढ झालेली आहे. आज प्रशासनाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अनेक नवीन आव्हाने प्रशासनापुढे उभी राहिली आहे.

**उद्देश :**

१. भारतातील प्रशासकीय व्यवस्थेचे अध्ययन करणे.
२. भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली त्यामुळे प्रशासनाच्या कार्यात प्रचंड वात्र झाली.
३. आज भारतीय प्रशासनापुढे अनेक आव्हाने उभी राहिली आहे.
४. भारतीय प्रशासनामध्ये नवीन सुधारणा घडवून येणे आवश्यक आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनात्मक शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग केला आहे. दुय्यम तथ्ये संकलनासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील संदर्भग्रंथ इंटरनेट सेवा इ. माध्यमांचा उपयोग केला आहे.

**तथ्य संकलन:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग केला आहे. त्यात संदर्भग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे, इंटरनेट इ. चा उपयोग केला आहे.

**भारतातील प्रशासकीय रचना:**

भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प्रशासनाच्या स्वरुपात अनेक नवीन परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीने नंतर भारताच्या लोकशाही विकासासाठी नवीन समाजरचनेसाठी नवीन प्रशासकीय युगाची सुरुवात करण्यात आली. भारतीय संविधानात प्रशासनाची उद्दिष्टे नमुद करण्यात आले देशाचा विकास पंचवार्षिक योजनेच्या आधारे व्हावा ही जबाबदारी प्रशासनावर टाकण्यात आली. भारतीय संविधानातील ७३ वी घटनादुरुस्ती आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने प्रशासनात अमुलाग्र बदल घडून आले आहे. भारताने पंचायतराज व्यवस्था स्विकारली. भारतीय पंचायतराज व्यवस्थेत प्रशासनाची रचना पुढील प्रमाणे दिसून येते.

**भारतीय प्रशासनसमोरील आव्हाने:**

कोणत्याही देशाचे भवितव्य तेथील मानवी सभ्यता आणि प्रशासनाच्या प्रगतीवर अवलंबून असते. भारत हा देश विविधतेने नटलेला देश आहे. भारतात अनेक मानवी सभ्यता व संस्कृती आढळून येतात. त्यामुळे भारतीय प्रशासनापुढे अनेक आव्हाने उभी झाले आहेत. आज भारतीय प्रशासनात बदल करणे आवश्यक आहे. प्रशासनाच्या समस्याचे निराकरण करणे आवश्यक आहे. साधारणपणे भारतीय प्रशासनापुढे काही आव्हाने दिसून येतात.

**१) सामाजिक आव्हाने:**

भारतीय प्रशासनासमोर काही सामाजिक आव्हाने उभी आहेत. भारतात अनेक धर्माचे जातीचे पंथाचे लोक राहतात. त्यांच्यामध्ये अनेक प्रश्नांवरुन वाद विवाद निर्माण होतात. भारतात फार मोठया प्रमाणात धार्मिक दंगली घडून आणल्या जातात. भारतीय समाजात नक्षलवाद, भाषिक वाद,जातीवाद, धर्मवाद, प्रादेशिक वाद अशी अनेक आव्हाने प्रशासनापुढे उभी असतात. त्यामुळे प्रशासनाला शांतता सुव्यवस्था व कायदा प्रस्थापित करताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.

**२) आर्थिक आव्हाने:**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने मिश्र व बंधिस्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. त्यामुळे बंदिस्त स्वरुपात भारताचा विकास संथगतीने सुरु होता. परंतु १९९२ नंतर देशात खुल्या

अर्थव्यवस्थेचा स्विकार करण्यात आला. त्यामुळे आज भारतीय उत्पादकांना जागतिक उत्पादनाची स्पर्धा करावी लागत आहे. स्पर्धा करीत असताना उत्पादन क्षमतेचा दर्जा टिकवणं हा सुन्दा भारतीय उद्योगासमोरील मोठा प्रश्न आहे. त्यामुळे जागतिकीकरणाच्या उदारीकरणाच्या व खाजगी करण्याच्या स्पर्धेत भारतीय अर्थव्यवस्था विकास करण्याचे मोठे आव्हान भारतीय प्रशासनापुढे उभे आहे.

**३) राजकीय आव्हाने:**

भारतीय प्रशासनाला काही राजकीय समस्यांना तोंड द्यावे लागते. भारताने लोकशाही शासन पध्दतीचा स्विकार केलेला आहे. लोकशाहीमध्ये भ्रष्टाचार, लालफितशाही, दप्तर दिरंगाई, नोकरशाही बेबंदशाही असे अनेक दोष आढळून येतात. तसेच काही राजकीय पुढारी सत्ता प्राप्तीच्या लालसेपोटी जवळच्या नातेवाईकांना व कार्यकत्यांना अत्यंत महत्त्वाचे प्रशासकीय पदावर नियुक्ती करताना दिसून येते. त्यामुळे प्रशासन कार्यात अनेक अडचणी निर्माण होतात.

**४) भ्रष्टाचार:**

भारतीय प्रशासनाला लागलेली कीड म्हणजे भ्रष्टाचार होय. आज भारतात दिल्लीपासून ते गल्लीपर्यंत च्या प्रशासनात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार आढळून येते. अगदी प्राचीन काळापासून भारतीय प्रशासनातील भ्रष्टाचार हा दोष आढळून येतो. प्रशासकीय अधिकारी वर्गात स्वार्थी हेतूने संपत्तीच्या अभिलाषापोटी भ्रष्टाचारी प्रवृत्ती वाढते. राजकीय पुढारी प्रतिनिधी मंत्री प्रशासनावर दबाव आणून गैरमार्गाचा स्वीकार करुन सनदी सेवांची भरती करतात. परिणामतः सनदी सेवक वर्ग लवकर श्रीमंत होण्याच्या उद्देशानं व वाम मार्गाचा वापर करुन पैसा जमा करतो. आजच्या काळात प्रशासनाच्या प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

**५) प्रशिक्षित अधिकारी वर्गाचा अभाव:**

भारतीय प्रशासनात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करायला सुरुवात झाली. आजही विविध विभागात अनेक महत्वाच्या पदावर अप्रशिक्षित सनदी सेवक कार्यरत असलेले दिसून येते. ज्या सनदी सेवकांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त आहेत असे सनदी सेवक नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करायला तयार नाहीत. त्यामुळे प्रशासन कार्याला गती येत नाही याचा परिणाम एकंदरीत भारतीय प्रशासनावर होताना दिसतो.

**६) प्रशासनात नवीन भरतीचा अभाव:**

वर्तमान काळात केंद्र सरकार असो व राज्य सरकार नवीन पदभरती ला मान्यता द्यायला तयार नाहीत. सनदी सेवक वर्गाच्या वेतनावर होणारा खर्च कमी करण्याच्या उद्देशाने शासन

नवीन पदभरती ला मान्यता देत नाही. याशिवाय सेवेत रुजू असलेले सनदी सेवकांना इच्छा सेवानिवृत्तीचा पर्याय उपलब्ध करून सनदी सेवकांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न शासनाकडून केला जात आहे. त्यामुळे भारतातील प्रशासकीय कार्य पार पाडणे हे प्रशासनाला अवघड झाले आहे.

**७) वाढती लोकसंख्या:**

वर्तमान काळात भारताची एकूण लोकसंख्या १२५ कोटीच्या वर गेलेली आहे. त्यामुळे नागरिकांच्या मुलभूत गरजा भागवणे प्रशासनाला अशक्य होत आहे. देशातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्या तुलनेत सनदी सेवकांची संख्या वाढविण्यापेक्षा सरकार सनदी सेवकांच्या संख्येत कपात करीत आहे. त्यामुळे नागरिकाना सर्व सेवा सुविधा देण्याचे मोठे आकान भारतीय प्रशासनापुढे उभे आहे. भारतीय प्रशासनाला प्रशासकीय क्षेत्रात फार मोठी जबाबदारी पार पाडावी लागत आहे. भारतात अनेक सामाजिक आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक समस्या आहे. त्या समस्यांना सामोरे जाताना प्रशासनात आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. भारतीय प्रशासनात सुधारणा करण्याच्या हेतूने सरकारने केलेल्या प्रयत्नांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**प्रशासकीय सुधारणा:**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने प्रशासकीय क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी विविध समित्या आणि आयोग स्थापन केले होते. त्यापैकी काही महत्वाची प्रशासकीय सुधारणा पुढीलप्रमाणे-

१. १९४६-४७ मध्ये भारतीय प्रशासनात सुधारणा करण्यासाठी सनदी सेवकांना वेतनाचा योग्य मोबदला देण्याची शिफारस बरदाचार्य आयोगाने केली होती.
२. १९४७ मध्ये गिरिजाशंकर समितीने सचिवालय पुनर्घटना करण्याची सूचना केली होती.
३. के.सी. नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय सुधारणासाठी १९४९ साली समिती स्थापन करण्यात आली. या समितीने भारतात प्रशासकीय सुधारण्यासाठी सल्लागार नियोजन मंडळ स्थापन करण्याची शिफारस केली होती.
४. ए.डी. गोरवाला समितीने (१९५१) सरकारी नोकरांना प्रशिक्षण, संघटना आणि पध्दती, संचालक कार्यालयाची नियुक्ती आणि शासन संस्थेच्या

कार्यक्षमतेत सुधारणा घडवून आणण्याची शिफारस केली होती.

५. १९५६ साली मुदलियार समितीने सनदी नोकरांच्या भरतीसंबंधी आवश्यक पात्रते संबंधित शिफारस केल्या होत्या.

६. १९६४ यावर्षी नियुक्त करण्यात आलेल्या के संथानम समितीने भारतीय प्रशासनातील भ्रष्टाचार कशाप्रकारे संपुष्टात आणता येईल. यासंदर्भात संसदेत आपला अहवाल सादर केला.

७. जानेवारी १९६६ रोजी मोरारजी देसाई यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय सुधारणा आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाने पुढील काही शिफारशी केल्या अ) भारतीय प्रशासनातील सनदी नोकल्यामध्ये उच्च दर्जाची कार्यक्षमता आणि कर्तव्य निष्ठा निर्माण करणे. ब) जनता केंद्रीत प्रशासकीय दृष्टिकोन निर्माण करणे. क) भारतीय लोक प्रशासनाला प्रभावी आणि कार्यक्षम बनविणे.

८. २००५ यावषी वीरप्पा मोईली यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा एकदा प्रशासकीय सुधारणा आयोग स्थापन करण्यात आला. या आयोगाने प्रशासनात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे प्रशासकीय कौशल्यात वाढ करणे, सनदी सेवकांच्या कौशल्यात वाढ करणे, तसेच लोकपाल संस्था स्थापन करण्याची शिफारस केली होती.

वरील सर्व समित्या व आयोगा शिवाय अनेक प्रशासकीय सुधारणा अहवाल सादर करण्यात आले होते. या सर्व समित्या, आयोग व अहवालाचा आढावा घेतला तर प्रशासनात वापर होणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**:

१. भारतीय प्रशासनात नवीन तंत्रज्ञानाचा वापर होणे आवश्यक आहे.

२. केंद्रीय प्रशासनात तसेच राज्य प्रशासनात रिक्त पदावर सनदी सेवकांची भरती करणे आवश्यक आहे. भारतीय प्रशासनात फोफावलेला भ्रष्टाचार आटोक्यात आणणे आवश्यक आहे. त्यासाठी व्यापक स्वरुपात जनजागृती होणे आवश्यक आहे.

३. प्रशासकीय कार्यात पारदर्शकता यावी यासाठी माहितीच्या अधिकाराचा विस्तार होणे अपेक्षित आहे.

४. भारतीय प्रशासन बहुतेकदा राजकीय दबावाखाली कार्य करताना दिसतो.

त्यामुळे राजकारणापासून प्रशासन विभक्त ठेवणे आवश्यक आहे.

५. केंद्र सरकारने व राज्य सरकारने प्रशासकीय क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्याच्या दृष्टीने सामाजिक संस्थांच्या माध्यमातून विद्यापीठांच्या माध्यमातून व महाविद्यालय स्तरावर संशोधन कार्यात प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तरच भारत हा भविष्यात महासत्ता राष्ट्र होईल.

**संदर्भसूची**:


१. संदर्भ ग्रंथ सूची- प्रा. बी. बी. पाटील, 'लोकप्रशासन सिद्धांत आणि व्यवहार' फडके प्रकाशन, कोल्हापुर. प्रथमावृत्ती २००५.

२. ना.र. इनामदार, लोकप्रशासन, साधना प्रकाशन पुणे, १९७५

३. प.सी. काणे. 'लोकप्रशासन' विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती जुलै २००१

४. प्रा. बी. बी. पाटील, भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर -२०१५

५. बी. एल. फाडिया, 'लोकप्रशासन', साहित्य भवन पब्लिकेशन, नई दिल्ली -२०१८

६. व्ही. बी. पाटील, भारतीय प्रशासन के सागर प्रकाशन, पुणे.

७. Google

८. Wikipedia